# सांस्कृतिक कार्यक्रम

**१) साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रम:-**महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये हिंदी साहित्य, लोकसाहित्य, संस्कृती व भाषा यापैकी एक अथवा अनेक प्रकारच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करता येईल. कार्यक्रम घेण्यासाठी अकादमीच्या कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये ठिकाणांची निवड करण्यात येईल व तेथे संगोष्ठी, नाटक, परिसंवाद, कविसंमेलन इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल. अकादमीच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत शहरांची नावे अंतिम झाल्यानंतर खर्चाच्या बाबवार सविस्तर प्रस्तावास शासनाची मान्यता घेऊन त्यानंतर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल.

**२) कार्यशाळा :-** हिंदी भाषा शुध्द स्वरुपामध्ये लिहिता-वाचता यावी, या उद्देशाने अकादमीमार्फत दरवर्षी प्रुफरिडींग व शुध्दलेखन कार्यशाळेचे आणि पटकथालेखन, अनुवाद इत्यादी कार्यशाळेचे आयोजन करण्यात येईल. याबाबतच्या प्रस्तावास शासन मान्यता घेऊन त्यानंतर कार्यशाळेचे आयोजन करण्यात येईल.

**३) महिला साहित्य सेमिनार:-** महिलांमध्ये हिंदी साहित्याबद्दलची जागृती निर्माण करण्यासाठी अकादमीमार्फत महिला साहित्य सेमीनार आयोजित करण्यात येईल. याबाबतच्या सविस्तर प्रस्तावास शासन मान्यता घेऊन त्यानंतर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल.

**४) पत्रकारीताशी संबंधित संगोष्ठी :-** प्रिंट मिडिया आणि इलेक्ट्रॉनिक मिडियाशी संबंधित सेमिनार आयोजित करण्यात येतील या बाबतच्या सविस्तर प्रस्तावास शासन मान्यता घेऊन त्यानंतर कार्यक्रमाचे आयोजन करावे.